# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/७९९
दिनांक : 20 JUN 2018

**विषय :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना **योजनेसाठी अर्ज करणा-या** विद्यार्थ्यांकडून ५० टक्के शुल्काची रक्कम न घेणेबाबत...

**संदर्भ :** शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४,दिनांक २०.६.२०१८

राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, ,शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४,दिनांक ७.१०.२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४२ मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत:-

" तथापि,उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणा-या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरूपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास वरीलप्रमाणे DBT द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/तंत्रनिकेतनास शुल्कापोटी तत्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये. **प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्केपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात येईल.**

**उपरोक्त तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ईबीसी/2018/ 2178
दिनांक :- 22 JUN 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यांवी. अन्यथा पत्रामधील दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही न केल्याचे निर्दशनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार तात्काळ कारवाई करण्यांत येईल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.